


# पारनेर दर्शन




वर्ष ४ अंक २००, मंगळवार १३ ऑक्टोबर २०२६ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी मुंबईत खलबते

**खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली पवारांची भेट | शरद पवारांचे मार्गदर्शन | राजकीय हालचालींना वेग | सिल्व्हर ओकवर सहकाऱ्यांसह भेट | सहकार क्षेत्रातील सद्यस्थिती आणि आगामी निवडणुकीच्या रणनीतीवर विचारविनिमय**

मुंबई : प्रतिनिधी

**अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय हालचालींना वेग येत असताना, ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांची मुंबईतील 'सिल्व्हर ओक' निवासस्थानी खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने भेट घेतली. या भेटीत जिल्ह्यातील सहकार क्षेत्राची सद्यस्थिती, बँकेच्या आगामी निवडणुकीची दिशा आणि संभाव्य रणनीती यांसंदर्भात सविस्तर चर्चा झाल्याची माहिती संबंधितांनी दिली.**

जिल्हा बँकेची निवडणूक ही केवळ एका सहकारी संस्थेच्या संचालक मंडळापुरती मर्यादित नसून, जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणांच्या दृष्टीनेही महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पवार यांच्याशी झालेल्या चर्चेकडे जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



### सहकार क्षेत्रातील अनुभवाचा आधार

शरद पवार यांना सहकार क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव आहे. साखर कारखाने, सहकारी बँका आणि विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या राजकारणात सहकार चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेच्या निवडणुकीसंदर्भात पवार यांच्याशी विचारविनिमय करण्यात आला. जिल्ह्यातील सहकार क्षेत्राची सध्याची परिस्थिती, आगामी निवडणुकीतील संभाव्य आव्हाने आणि पुढील वाटचालीसाठी आवश्यक असलेली रणनीती या विषयांवर चर्चा करून त्यांचे मार्गदर्शन घेण्यात आल्याचे भेटीनंतरच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, या चर्चेत कोणते विशिष्ट निर्णय घेण्यात आले किंवा निवडणुकीसंदर्भात कोणती भूमिका निश्चित करण्यात आली, याबाबत तपशील जाहीर करण्यात आलेला नाही.

### बँकेच्या निवडणुकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील महत्त्वाची वित्तीय संस्था आहे. जिल्ह्यातील विविध सहकारी संस्थांशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतील तिचे स्थान लक्षात घेता, बँकेच्या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त होते. या निवडणुकीत विविध राजकीय गटांची भूमिका, सहकारी संस्थांमधील प्रतिनिधित्व आणि संभाव्य आघाड्यांची जुळवाजुळव यांवर निकालाचे राजकीय परिणाम अवलंबून असू शकतात. त्यामुळे निवडणुकीपूर्वी ज्येष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी आणि चर्चांना महत्त्व प्राप्त झाले आहे. पवार यांच्याशी झालेल्या भेटीतून आगामी निवडणुकीसाठी नेमकी कोणती दिशा ठरते, तसेच जिल्ह्यातील विविध राजकीय गटांशी समन्वयाची भूमिका कशी राहते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. तथापि, या भेटीच्या आधारे कोणतीही राजकीय आघाडी किंवा निवडणूकविषयक अंतिम निर्णय झाल्याचे स्पष्ट होत नाही.

### विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती

या भेटीवेळी खासदार नीलेश लंके यांच्यासह माजी खासदार सदाशिवराव लोखंडे, अहिल्यानगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा. सीताराम काकडे, ॲड. संदीप वर्पे, जिल्हा बँकेचे माजी संचालक अमित भांगरे व दत्तात्रेय पानसरे, केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष ऋषिकेश ढाकणे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रताप पाटील शेळके आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राहाता तालुकाध्यक्ष सुधीर मस्के यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेमुळे जिल्हा बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय आणि सहकार क्षेत्रातील घडामोडींना महत्त्व प्राप्त झाले आहे. पवार यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा उपयोग करून जिल्ह्यातील सहकार चळवळ अधिक बळकट करण्याचा प्रयत्न असल्याचे भेटीच्या निमित्ताने सांगण्यात आले. आगामी काळात जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी कोणती समीकरणे आकाराला येतात, विविध गटांमध्ये कशा प्रकारे समन्वय साधला जातो आणि या भेटीचे पुढील राजकीय घडामोडींमध्ये काय पडसाद उमटतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

## पारनेर काँग्रेसमध्ये वाफारेंच्या हस्तक्षेपाचा भडका!

**रोहोकलेंचा थेट हल्लाबोल | काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष निवडीवरून पारनेरमध्ये रणकंदन | निष्ठावंतांना डावलल्याचा आरोप | ईश्वर दिवटे यांच्या नियुक्तीला विरोध | तालुका कार्यकारिणीच्या सामूहिक राजीनाम्याचा इशारा**



पारनेर : प्रतिनिधी

पारनेर तालुका काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या निवडीवरून पक्षांतर्गत संघर्ष उफाळून आला असून, या वादामुळे काँग्रेसमधील गटबाजी चव्हाट्यावर आली आहे. आठ वर्षे पक्षवाढीसाठी काम केल्याचा दावा करणारे विद्यमान तालुकाध्यक्ष संभाजीराव रोहोकले यांनी नूतन अध्यक्ष ईश्वर दिवटे यांच्या निवडीवर तीव्र आक्षेप घेतला आहे. या निवडीमागे ज्ञानदेव वाफारे यांची भूमिका असल्याचा आरोप करत रोहोकले यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली. निष्ठावंत कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता झालेली ही नियुक्ती मान्य नसल्याचे स्पष्ट करत तालुका कार्यकारिणीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनाम्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे पारनेरमध्ये काँग्रेसची संघटनात्मक घडी विस्कटण्याची चिन्हे दिसत आहेत.

### बाहेरच्यांना पदे कशासाठी?

रविवारी (११ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता पारनेर येथील शासकीय विश्रामगृहात संभाजीराव रोहोकले आणि तालुका कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेत नवीन अध्यक्षांच्या निवडीबाबत नाराजी व्यक्त केली. काँग्रेसचे प्राथमिक सदस्यत्वही नसलेल्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाशी संबंधित व्यक्तीला तालुकाध्यक्षपद देण्यात आल्याचा आरोप रोहोकले यांनी केला. पक्षासाठी वर्षानुवर्षे राबणाऱ्या कार्यकर्त्यांना बाजूला सारून अशा प्रकारे नियुक्ती केली जात असेल, तर पक्ष संघटना कशी वाढणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. तालुकाध्यक्षपदाची निवड करताना पक्षातील निष्ठावंतांचा विचार होणे आवश्यक होते; मात्र प्रत्यक्षात वेगळेच चित्र दिसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

### १९८५ पासून काँग्रेसमध्ये; तरीही विश्वासात घेतले नाही!

संभाजीराव रोहोकले म्हणाले की, आपण १९८५ पासून काँग्रेस पक्षाचे काम करत आहोत. माजी खासदार बाळासाहेब विखे, राधाकृष्ण विखे आणि बाळासाहेब थोरात यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव आहे. २०१९ मध्ये विखे कुटुंबीयांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर आपण त्यांच्यासोबत न जाता काँग्रेसमध्येच राहण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी आपल्यावर तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. गेल्या आठ वर्षांत तालुक्यातील वाड्या-वस्त्यांपर्यंत जाऊन पक्ष वाढविण्यासाठी प्रयत्न केले. संघटना मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांची फळी उभी केली. असे असताना अध्यक्षपदाच्या बदलाबाबत आपल्याला विश्वासात न घेता निर्णय घेण्यात आल्याने पक्षातील निष्ठावंतांच्या योगदानाचे नेमके मोल काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

### बैठकीनंतर दोन तासांत ठराव !

बैठक संपल्यानंतर आपण पारनेर तालुका दूध संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला गेलो. त्यानंतर सुमारे दोन तासांनी ज्ञानदेव वाफारे यांनी पक्षाबाहेरील कार्यकर्त्यांना बोलावून ईश्वर दिवटे यांच्या नावाचा ठराव झाल्याचे वरिष्ठांना भासविल्याचा आरोप रोहोकले यांनी केला. या संपूर्ण प्रक्रियेत पक्षाच्या अधिकृत संघटनात्मक यंत्रणेचे पालन झाले का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. या प्रकरणी आपण बाळासाहेब थोरात यांची भेट घेतली होती. तालुक्यातील फेरबदल करताना आपल्याला विश्वासात घेतल्याशिवाय निर्णय होणार नाही, असे आश्वासन मिळाल्याचे रोहोकले यांनी सांगितले. मात्र, प्रत्यक्षात दिलेला शब्द पाळला गेला नसल्याची नाराजीही त्यांनी व्यक्त केली.

### २४२ बुथवरील काम थांबविण्याचा इशारा

युवक तालुकाध्यक्ष योगेश शिंदे यांनीही या नियुक्तीविरोधात आक्रमक भूमिका मांडली. त्यांच्या म्हणण्यानुसार, तालुक्यातील २६२ पैकी २४२ बुथवर बीएलए-२ नियुक्त करण्याचे काम संभाजीराव रोहोकले यांनी परिश्रमपूर्वक पूर्ण केले होते. मात्र, अध्यक्षपदाच्या निवडीवरून निर्माण झालेल्या वादानंतर या नियुक्त कार्यकर्त्यांनी फोन आणि निरोपांद्वारे बुथवर काम न करण्याचा निर्णय कळविल्याचा दावा शिंदे यांनी केला. हा निर्णय कायम राहिल्यास आगामी संघटनात्मक कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. बूथस्तरावरील यंत्रणा ही पक्षाच्या संघटनात्मक कामाचा महत्त्वाचा आधार मानली जाते. त्यामुळे या वादातून निर्माण झालेली नाराजी वरिष्ठ नेतृत्व कशा प्रकारे हाताळते, याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

### राजीनाम्याच्या भूमिकेमुळे पेच

या पदाधिकाऱ्यांनी नवीन तालुकाध्यक्षांच्या निवडीला विरोध दर्शविल्याने पारनेर काँग्रेससमोर संघटनात्मक पेच निर्माण झाला आहे. नियुक्ती कायम राहणार की वरिष्ठ नेतृत्व फेरविचार करणार, तसेच सामूहिक राजीनाम्याची भूमिका प्रत्यक्षात येणार का, हे आगामी काळात स्पष्ट होईल.

### वाफारेंच्या भूमिकेवर रोहोकलेंचा थेट प्रहार

ज्ञानदेव वाफारे यांच्या भूमिकेवर टीका करताना रोहोकले यांनी अत्यंत बोचरे वक्तव्य केले. पतसंस्थेतील आर्थिक घोटाळ्याच्या प्रकरणात वाफारे यांना जन्मठेपेची शिक्षा झाल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, एक कोटी रुपयांचा जामीन त्यांनी कुठून भरला आणि त्यांच्या उत्पन्नाचे स्रोत काय, असे प्रश्न उपस्थित केले. वाफारे यांच्या राजकीय हस्तक्षेपाबाबत कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असल्याचा दावा करत, त्यांना 'साहेब' म्हणण्याच्या योग्यतेवरही रोहोकले यांनी प्रश्न उपस्थित केला.

## पशुधनाच्या चारा नियोजनाला वेग

**जिल्ह्यात ६४ हजार ३७१ पशुपालकांचे सर्वेक्षण पूर्ण | हिरवा-कोरडा चारा, मुरघास आणि रब्बीतील चारा उत्पादनासाठी उपलब्ध क्षेत्राची होणार नोंद**



अहिल्यानगर : प्रतिनिधी

**कमी आणि खंडित पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीत पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने हालचाली वेगवान केल्या आहेत. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निर्देशानुसार पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्ह्यातील पशुपालकांचे सर्वेक्षण सुरू असून, आतापर्यंत ६४ हजार ३७१ पशुपालकांची माहिती संकलित करण्यात आली आहे.** या सर्वेक्षणाच्या आधारे जिल्ह्यातील चाऱ्याची उपलब्धता, पशुधनाची संख्या आणि आगामी काळातील चाऱ्याची गरज यांचा आढावा घेऊन नियोजन करण्यात येणार आहे.

राज्यात अनेक ठिकाणी कमी अथवा खंडित पाऊस झाल्याने शेतीच्या उत्पादनावर परिणाम होण्याबरोबरच पशुधनाच्या चारा उपलब्धतेचाही प्रश्न

उर्वरीत पान ३ वर

## रस्त्याच्या कामात पारनेरच्या पाणीपुरवठा यंत्रणेचे नुकसान!

**खडकीदेवीभोयरे फाटा रस्त्याच्या कामात पाइपलाइन व पंपिंग स्टेशन उद्ध्वस्त | नगराध्यक्ष डॉ. विद्या कावरे यांचे पालकमंत्र्यांना निवेदन**

पारनेर : प्रतिनिधी

तालुक्यातील खडकी ते देवीभोयरे फाटा या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामादरम्यान सार्वजनिक पायाभूत सुविधांचे नुकसान झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या रस्त्याचे काम करताना संबंधित ठेकेदाराकडून सुपा एमआयडीसी ते हंगा तलाव यांना जोडणारी पारनेर नगरपंचायतीच्या मालकीची मुख्य पाणीपुरवठा पाइपलाइन आणि पंपिंग स्टेशनचे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे



शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त यंत्रणेची दुरुस्ती करावी आणि संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी नगराध्यक्ष डॉ. विद्या कावरे

उर्वरीत पान ३ वर

## एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश !

**| तुकाराम मुंढे यांच्याकडे पेपरफुटी चौकशीची जबाबदारी!**
**| दोन महिन्यांसाठी आंदोलन स्थगित**
**| तीन वर्षांत ७० हजार पदे भरण्याचा सरकारचा निर्णय**

पुणे : प्रतिनिधी

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील कथित पेपरफुटी प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांचा समावेश असलेली समिती नेमण्याची मागणी राज्य सरकारने मान्य केली आहे. तसेच पेपरफुटी झालेल्या सर्व परीक्षांची चौकशी, आंदोलनादरम्यान आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेणे, सन २०२७ मध्ये होणाऱ्या गट-क परीक्षेतील पदांची संख्या दुप्पट करणे आणि पुढील तीन वर्षांत ७० हजार पदे भरण्याबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. या निर्णयांचा मसुदा मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी पुण्यात आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांसमोर सादर केला. त्यानंतर आंदोलक विवेकानंद पाटील यांनी सोमवारी पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास दोन महिन्यांसाठी आंदोलन स्थगित करीत असल्याची घोषणा केली.**

एमपीएससीच्या परीक्षांमधील कथित गैरप्रकार, पेपरफुटी आणि भरती प्रक्रियेतील सुधारणांच्या मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी पुण्यात आंदोलन सुरू केले होते. आमदार रोहित




पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळत होता. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी पुढाकार घेतला. त्यांनी आमदार रोहित पवार यांना चर्चेसाठी आमंत्रित केले. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे दोन तास चर्चा झाली. या वेळी रोहित पवार यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्या सरकारसमोर मांडल्या, तर शिवेंद्रराजे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

चर्चेनंतर सरकारने घेतलेल्या निर्णयांचा मसुदा तयार करून तो रोहित पवार आणि आमदार विश्वजीत कदम यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. त्यानंतर शिवेंद्रराजे भोसले

उर्वरीत पान ३ वर

## सखी माझी लावणी हरपली!

**ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांचे निधन | वयाच्या ७३व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास | मराठी चित्रपटसृष्टीसह लावणी क्षेत्रावर शोककळा**

पुणे : प्रतिनिधी

**आपल्या नजाकतदार लावणीने आणि कसदार अभिनयाने तब्बल चार दशके मराठी रसिकमनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ लावणी कलावंत आणि अभिनेत्री मधू कांबीकर यांचे पुण्यात प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्या ७३ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाने मराठी लोककला, रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील एका महत्त्वपूर्ण पर्वाचा अंत झाल्याची भावना व्यक्त होत असून, अवघ्या सांस्कृतिक महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे.**

लावणीला केवळ मनोरंजनाचे साधन न ठेवता तिला आदराचे आणि वैभवाचे स्थान मिळवून देणाऱ्या मोजक्या कलावंतांमध्ये मधू कांबीकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. लोकनाट्य, तमाशा, प्रायोगिक रंगभूमी ते रुपेरी पडदा असा बहुआयामी प्रवास करत त्यांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या अस्सल मातीतील कलेला घराघरांत पोहोचवले.



### संघर्षाची देदीप्यमान यशोगाथा

मधू कांबीकर यांचा जन्म २८ जुलै १९५३ रोजी बीड जिल्ह्यातील माळेगाव खुर्द या छोट्याशा खेड्यात झाला. लहानपणापासूनच कलेची उपजत आवड असलेल्या मधूताईंनी अत्यंत प्रतिकूल आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीशी दोन हात करत कलाक्षेत्रात पाऊल ठेवले. लावणीला अभिजात नृत्याची जोड देण्यासाठी त्यांनी कथ्थक नृत्याचे शास्त्रोक्त प्रशिक्षण घेतले. त्यामुळे त्यांच्या सादरीकरणात अनोखा तोरा, तोल आणि ठहराव पाहायला मिळत असे.

### हनुमान थिएटरमधून कारकिर्दीची मुहूर्तमेढ

१९७३ मध्ये मुंबईतील लालबाग येथील ऐतिहासिक आणि लोककलेचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या 'न्यू हनुमान थिएटर'मधून त्यांच्या व्यावसायिक कलाप्रवासाला सुरुवात झाली. त्यांच्या घुंगरांच्या नादाने आणि नृत्यातील अदाकारीने अवघ्या मुंबईकरांना भुरळ घातली. लावणीच्या मंचावर त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आणि पुढे याच कलेच्या बळावर मराठी मनोरंजनविश्वात मानाचे स्थान मिळवले.

### रुपेरी पडदा गाजवला

लावणीच्या मंचावरून सुरू झालेला हा प्रवास पुढे मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत दिमाखात बहरला. 'सतीची पुण्याई', 'शापित', 'ह्योच नवरा पाह्यजे', 'हेच माझं माहेर', 'बिनकामाचा नवरा', 'रावसाहेब', 'डेबू', 'माझा छकुला' आणि महेश कोठारे दिग्दर्शित 'झपाटलेला' या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका गाजल्या. डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित आणि पु. ल. देशपांडे यांच्या पटकथेवर आधारित 'एक होता विदूषक' या चित्रपटातील त्यांची व्यक्तिरेखा आणि लावणी विशेष लक्षवेधी ठरली. चित्रपटांमध्ये केवळ नृत्यांगना म्हणून मर्यादित न राहता त्यांनी सोशिक आई, कणखर सासू अशा कौटुंबिक नात्यांतील विविध छटा आपल्या सहज आणि नैसर्गिक अभिनयातून पडद्यावर जिवंत केल्या.

### अखेरचा रंगमंच आणि नियतीचा आघात

मधू कांबीकर यांच्या आयुष्यात २७ नोव्हेंबर २०१६ हा दिवस दुर्दैवी ठरला. मुंबईतील माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात आयोजित 'लावण्य संगीत' या विशेष कार्यक्रमात त्या तब्बल १२ वर्षांनंतर पुन्हा मंचावर उतरल्या होत्या. नृत्याचे सादरीकरण सुरू असतानाच त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. मात्र, मंचावर गेलेला कलावंत अर्धवट माघार घेत नाही, या लोककलावंताच्या बाण्याने त्यांनी त्रास सहन करत शेवटची 'भैरवी' सादर केल्याचे सांगितले जाते.

### कांबी गावाशी जुळलेले भावनिक नाते

मधू कांबीकर यांचा जन्म बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात झाला असला, तरी त्यांचे बालपण अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील कांबी गावात गेले. याच परिसरात त्यांच्या कलात्मक व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली. त्यांचे वडीलही कलावंत असल्याने लहानपणापासूनच त्यांना नाटक, लोककला आणि सादरीकरणाच्या वातावरणाचा परिचय झाला. कांबी गावाशी जुळलेले त्यांचे हे नाते त्यांच्या जीवनप्रवासातील एक महत्त्वाचा भावनिक धागा ठरले.

### पक्षाघाताचा झटका

प्रेक्षकांची दाद घेऊन नेपथ्यात, म्हणजेच मेकअप कक्षात परतल्यानंतर त्यांना पक्षाघाताचा तीव्र झटका आल्याचे वृत्त आहे. या झटक्यामुळे त्यांचा उजवा हात बधिर झाला आणि प्रकृती गंभीर बनली. त्यानंतर त्या पूर्वीप्रमाणे मंचावर घुंगरू बांधून उभ्या राहू शकल्या नाहीत. प्रकृती खालावल्यामुळे त्यांना आपल्या लाडक्या कलाक्षेत्रापासून आणि कॅमेऱ्यापासून दूर राहावे लागले.

### लोककलेच्या संवर्धनासाठी मधूप्रीतम

लोककलेच्या प्रसारासाठी १९९६ मध्ये त्यांनी 'मधुप्रीतम' ही संस्था सुरू केली. 'सखी माझी लावणी' या कार्यक्रमातून त्यांनी पारंपरिक लावणीचा इतिहास आणि तिचे विविध प्रकार प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. लावणीच्या लिखित स्वरूपातील नोंदी जमवून तमाशाच्या इतिहासाची मांडणी करण्याचे कामही त्यांनी केले. यासाठी त्यांना आपल्या तमाशा फडातील कलाकारांचे सहकार्य लाभले. एक कलाकार म्हणून मिळवलेल्या लोकप्रियतेचा उपयोग कलेच्या संवर्धनासाठी केला.

### जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

मराठी कलासंस्कृतीच्या संवर्धनासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेत २०१८ मध्ये त्यांना 'झी चित्र गौरव जीवनगौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आल्याची माहिती आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्या प्रत्यक्ष पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहू शकल्या नव्हत्या. त्यांच्या वतीने त्यांची सून शीतल जाधव यांनी पुरस्कार स्वीकारला होता.

### अहिल्यानगरच्या सांस्कृतिक वैभवातील महत्त्वाचे नाव

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्याशी असलेले भावनिक नाते लक्षात घेता, मधू कांबीकर या जिल्ह्याच्या सांस्कृतिक वैभवातील एक महत्त्वाचे नाव ठरतात. आपल्या अभिनय आणि लावणीच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्राच्या लोककलेला व्यापक ओळख मिळवून दिली. त्यांच्या प्रदीर्घ कलाप्रवासामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. त्यांची कारकीर्द जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रासाठी कायम प्रेरणादायी ठरेल.

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी



# नवरात्रीत करा घरच्या घरी मेकअप

**यंदा ब्युटी पार्लरमध्ये जाऊन खास नवरात्रीसाठी मेकअप आणि मनाप्रमाणे लुक करून घेणं शक्य नाही. पण, काळजी करण्याची आवश्यकता नाही. काही ठरावीक गोष्टी लक्षात ठेवल्यास घरच्या घरी उत्तम मेकअप करता येऊ शकेल. तुम्हाला बेसिक मेकअप टिप्स माहीत असतील तर घरबसल्या स्वतःचा मेकअप नक्कीच करू शकता.**

## करा सुरुवात

आऊटफिटवर साजेसा मेकअप करायला सर्वांनाच आवडतो. मेकअप करण्याआधी त्याचे टप्पे जाणून घेणं गरजेचं आहे. सर्वात आधी चेहरा स्वच्छ पुसा आणि मॉयश्चरायजर लावा. त्यानंतर प्रायमर लावा. प्रायमर लावल्यानं मेकअप व्यवस्थितपणे सेट होण्यास मदत होते. नवरात्रीत गडद मेकअप करण्यावर भर दिला जातो. तुमच्या पेहरावाला शोभून दिसेल अशा शेड्सचे शिमर, हायलायटर, ब्लश वापरावेत. गडद मेकअप करायचा असल्यास चंदेरी, सोनेरी, ब्राँझ रंगाच्या शिमर्सची मदत घ्या. चेहऱ्यावर असणारे डाग लपवण्यासाठी बाजारात खास तीन ते चार रंगाचे करेक्टर्स मिळतात ते विकत घ्या. सणावारानुसार मेकअप कसा करायला हवा याबद्दल असंख्य व्हिडीओज युट्यूबवर उपलब्ध आहेत.

## हेअरस्टाइलचे पर्याय

हेयरस्टाइल नेहमी मेकअपआधी करावी. ओढणी घेण्याच्या पद्धतीवरून केशरचना करा. जर ओढणी डोक्यावर घेत असाल तर साधा बन बांधून ऑक्सिडाइज्ड हेअर ॲक्सेसरीजनं सजवा. ओढणी एका बाजूला घेत असाल तर फिश टेल पोनी आणि ब्रेडस बांधण्याचा पर्याय आहे. गरबा आऊटफिटवर हेअरस्टाइल कशी करावी याबद्दल अनेक व्हिडीओज युट्यूबवर उपलब्ध आहेत. हेअरस्टाइल आणखी खुलून दिसण्यासाठी मांगटिकाची (बिंदी) मदत घ्या.

## महत्त्वाचा टप्पा

नवरात्रीमध्ये स्मोकी आइज मेकअपची प्रचंड क्रेझ असते. डोळ्यांचा मेकअप शक्यतो चेहऱ्याच्या आधी करावा. त्यामुळे आयशॅडोचे रंग चेहऱ्यावर पडून मेकअप खराब होण्याची शक्यता कमी होते. तुम्ही जर लेन्स वापरत असाल तर ते मेकअप करण्याच्या आधी लावावेत. डोळ्यांचा मेकअप करताना डोळ्यांखाली असणारी काळी वर्तुळं कलर करेक्टर किंवा कन्सिलरनं लपवा. हायलायटर, फाऊंडेशन आणि कन्सिलर विकत घेताना तुमच्या रंगाच्या एक शेड सौम्य घ्यावं. डोळ्यांच्या मेकअपमध्ये आयब्रो पेन्सिल आणि मस्कारा लावायला विसरू नका. जेल बेस असणाऱ्या लिपस्टिक्स ऐवजी जलरोधक आणि मॅट बेस किंवा लिक्विड मॅट लिपस्टिकची निवड करा.



## टिप्स

- सणासुदीला मेकअप करताना कायम जलरोधक प्रॉडक्ट्सची निवड करा.
- तेलकट त्वचा असणाऱ्यांनी मॅट तर कोरडी त्वचा असणाऱ्यांनी मॉयश्चरायजर किंवा क्रीम बेस फाऊंडेशनचा वापर करावा.
- मान आणि चेहऱ्याचा टोन समान दिसेल या हिशोबानं मेकअप करा.
- नवरात्रीच्या मेकअपमध्ये टिकलीला महत्त्व असतं. मोठ्या आकाराच्या टिकल्यांना प्राधान्य देऊ शकता.
- तुमचा मेकअप किट आणि ब्रशेस इतरांसोबत शेअर करू नका. त्यानं जंतुसंसर्ग होऊ शकतो.
- मेकअप टिकून राहण्यासाठी मेकअप सेट करणारा स्प्रे वापरावा.
- नवरात्रीत चेहऱ्याला सलग नऊ दिवस गडद मेकअप लावल्यामुळे त्याचे परिणाम होऊ शकतात. निरोगी आणि तजेलदार त्वचेसाठी चेहऱ्यावर नियमित मॉयश्चरायजर आणि इसेसेन्शियल ऑइल्स लावा.



# ९ दिवस नटण्यामुरडण्याचे!

**येत्या दोन-तीन दिवसांतच नवरात्राला सुरवात होईल. गरब्याचा नाद घुमेल. दागिने, घागरे यांची झगमग दिसेल. या नऊ दिवसांत नटण्यामुरडण्याची हौस सगळ्या मुली भागवून घेतात. या नऊ दिवसांत इन फॅशन अशा कोणत्या गोष्टी असतील, त्याबद्दल...**

## बहुढंगी दांडिया



- आपल्या कपड्यांप्रमाणे आणि दागिन्यांप्रमाणे दांडियाही फॅशनेबल हव्यात. त्या तशा नसतील तर काही गंमत नाही. म्हणूनच बाजारात अनेक प्रकारच्या दांडिया आल्या आहेत.
- डिस्को दांडिया : डीजेच्या तालावर नाचण्यासाठी हल्ली निऑन स्टिकचा वापर करतात. त्यांनाच थोडं मजबूत करून एलईडी स्टिक्स दांडिया बाजारात आल्या आहेत.
- झुमकेवाल्या दांडिया : झुमके ही मुलींची आवडती गोष्ट आहेच. अगदी कानातल्यांपासून बांगड्यांपर्यंत त्यांचा वापर होतो आहे. त्यामुळेच आता आल्या आहेत, खास रंगीबेरंगी आणि वर्कवाले झुमके असलेल्या दांडिया.
- राजा राणी दांडिया : राजस्थानच्या सहलीला गेल्यावर तिथल्या प्रसिद्ध बाहुल्या सगळेच आणतात. त्याच बाहुल्या मध्यभागी लावून दांडियाला अधिक आकर्षक बनवलं जातं.
- बांधणी दांडिया : पारंपरिक दांडियालाच बांधणीचा कपडा लावून या तयार होतात. त्याला खाली घुंगरूही लावलेले असतात. याचं वैशिष्ट्यं म्हणजे यातली भन्नाट रंगसंगती.
- ट्विस्ट दांडिया : स्टीलच्या दांडियामध्ये एक गोलाकार चक्र असते. त्यामुळे दोन्ही बाजूने तुम्ही दांडिया खेळू शकता.

## दसनूर कपडा

सण कोणताही असो, आपल्याला नवे कपडे खरेदी करण्यासाठी एक निमित्त हवं असतं. नवरात्र म्हणजे तर अगदी रंगांचाच सण. नवरात्रासाठी नेहमीची घागरा चोली किंवा चणिया चोली तर असतेच पण त्याशिवायही अनेक प्रकार बाजारात आलेले आहेत.

- रेडीमेड चोली : यंदा बाजारात कच्छी एम्ब्रॉयडरीच्या रेडिमेड चोलीज आलेल्या आहेत. या तुम्ही साडी आणि घागरा दोन्हीवर वापरू शकता. त्यात अतिशय सुंदर रंग आणि नक्षीही उपलब्ध आहेत.
- जॅकेट : पांढऱ्या कुर्त्यावर रंगीबेरंगी जॅकेट घालून तुम्ही हटके लूक आणू शकता. त्यावर वेगवेगळ्या पद्धतीची डिझाइन केलेली असते. ही जॅकेट लाल, निळ्या, हिरव्या, पिवळ्या अशा उठावदार रंगांमध्ये उपलब्ध आहेत. नवरात्रानंतरही तुम्ही ही जॅकेट स्कर्ट किंवा जीन्सवर वापरू शकता.
- क्रॉप टॉप : घागऱ्यावर किंवा डिझायनर स्कर्टवर असा क्रॉप टॉप स्टाइलचा ब्लाऊज घालता येईल. तसंच यासोबत धोती पँट आणि कच्छी ज्वेलरी घालून मस्त हटके लुकही मिळवता येईल.
- धोतीपँट : मुलींमध्ये याची खूप क्रेझ आहे. या दिसायला अतिशय सुंदर आणि हटके असतात. यावर कमरपट्टा आणि हाफ कुर्ता, जॅकेट घालून एक वेगळा आऊटफिटही तयार होईल.
- रंगीत ओढण्या : एम्ब्रॉयडरी केलेल्या भरजरी ओढण्या या काळात अतिशय लोकप्रिय होतात. यंदाही यात अनेक प्रकारच्या ओढण्या आल्या आहेत. हातमागावर या ओढण्या बनतात. त्यावर अतिशय बारीक आणि नाजूक काम केलेलं असतं. त्याची रंगसंगती तर केवळ अप्रतिम असते. या तुम्ही कशावरही वापरू शकता. घागरा-चोली, पंजाबी, जीन्स, स्कर्ट अशा कोणत्याही ड्रेसवर हटके ड्रेप करून घेतलेल्या या ओढण्या उठावदार दिसतात.
- कुर्ता : कुर्ता हा प्रकार काही मुलांची मक्तेदारी नाही. मुलींनाही तो हल्ली विशेष भावताना दिसतोय. त्यातही कॉटन बांधणी, हाफ कुर्ता, शॉर्ट कुर्ता, लाँग कुर्ता, अनारकली कुर्ता अशा अनेक प्रकारातले कुर्ते सध्या बाजारात आहेत. राजस्थानी झलक असलेले कुर्ते घेतलेत तर आणखीच उत्तम.
- मोजडी : राजस्थानी एम्ब्रॉयडरीच्या मोजडीजना नवरात्रात खूप मागणी असतेच. त्यामुळे यात अनेक प्रकार बाजारात येत असतात. राजस्थानी स्टाइलच्या या मोजडीज तुम्ही नंतरही वापरू शकता.

## दागिन्यांची रेलचेल

- नवरात्रीच्या दिवसांत जिकडेतिकडे दागिन्यांचा लखलखाट दिसून येतो. कच्छी, राबेरी, काच, काचेचे मणी, मेटल, ऑक्साइड, कापड, लाकूड अशा अनेक प्रकारांचे दागिने नवरात्रीत घातले जातात.
- मोतीवाले झुमके : सध्या जिकडेतिकडे झुमक्यांची क्रेझ आहे. त्यातही मोती लावलेले झुमके तर मुलींमध्ये भलतेच लोकप्रिय आहेत. हे झुमके घागरा-चोलीवर विशेष उठून दिसतात.
- गोंड्याच्या बांगड्या : राजस्थानी स्टाइलच्या बांगड्याना शोभेल असे रंगीत गोंडे लावल्यावर या बांगड्या तयार होतात. यात लाखेच्या बांगड्यांची विशेष क्रेझ आहे. मोठ्या आकाराची कडीही या दिवसांत छान दिसतात.
- कच्छी दागिने : कवडी आणि वेगवेगळ्या कच्छी एम्ब्रॉयडरीने कापडावर केलेल्या दागिन्यांना कच्छी दागिने म्हणतात. कमर बंध, बाजूबंद, मांगटिका, मंगल हार अशा पद्धतीतले हे दागिने सध्या खूप लोकप्रिय आहेत. गरब्यासाठी तर ते अगदी उठून दिसतात.
- कापडी कडे : पंज्याला उठावदार दिसतील असे हे कापडी कडे दिसायला खूप आकर्षक आहेत. कच्छी दागिने, राबेरी दागिने, काचेच्या मण्यांचे दागिने, या सगळ्या प्रकारात हे दागिने उपलब्ध आहेत. काचा, विविध एम्ब्रॉयडरीचा वापर करून हे कडे बनवले जातात.
- कमरपट्टा : गरब्याला कुठलेही हटके कपडे ट्राय करताना त्यावर कमरपट्टा खूप शोभून दिसतो. यंदा मार्केटमध्ये वेगवेगळ्या पद्धतीचे कमरपट्टे आले आहेत. त्यावर सुंदर आकर्षक डिझाइन्स असतात. पोपट, मोर अशा पक्ष्यांचा वापर केलेले झल्ला पद्धतीचे कमरपट्टे आले आहेत.
- साडी पिन : घागरा चोळी किंवा भरजरी साडीला व्यवस्थित चापूनचोपून बसवण्यासाठी त्यावर शोभेल अशी साडी पिन हवीच. त्यासाठीच बाजारात भरजरी साडी पिना आल्या आहेत.

## काळजी घ्या स्वतःची

नवरात्रीचे हे नऊ दिवस नेमकं काय काय करावं, कसं कसं सजावं याची एक यादीच तुम्ही बनवली असेल ना मैत्रिणींनो? सध्या अनेक स्पा सेंटर्स आणि ब्युटी पार्लरमध्ये खास गरब्यानिमित्त ऑफर्स चालू आहेत. हेअर स्पा, बॉडी स्पा, फेशिअल्स, पेडिक्युअर, मॅनीक्युअर, बॉडी रॅप, फ्रुट रॅप अशा अनेक पद्धतीच्या स्पा ट्रीटमेंट मुली करून घेत असतात. अर्बन स्पा, डेस्टीनेशन स्पा, मेडिकल स्पा, हॉट स्पा, आयुर्वेदिक स्पा, क्रुझ स्पा, मिनरल स्पा, इको स्पा हे यातील आणखी नवे प्रकार म्हणता येतील. सध्या सगळ्यात जास्त मागणी आहे ती आयुर्वेदिक स्पा आणि मेडीकल स्पा या पद्धतींना. यात शक्यतो केमिकल्सचा वापर टाळून ट्रीटमेंट केली जाते. घरच्या घरीसुद्धा ऑलिव्ह ऑइल, मध, केळं, काकडी, हळद, भोपळा, नारळ, फळं याचा उपयोग करून स्पा ट्रीटमेंट करता येते. या प्रकारातील स्पा ट्रीटमेंट साधारण ५०० रुपयापासून सुरू होतात. पण या ट्रीटमेंट करून घेताना काही नियम पाळायला हवेत.

- मद्यपान करून किंवा धूम्रपान करून मग स्पा घेऊ नका.
- तुम्हाला हृदयविकाराचा त्रास असेल, उच्च रक्तदाब किंवा कमी रक्तदाबाचा त्रास असेल, तुम्ही मधुमेहाचे रुग्ण असाल तर स्पा ट्रीटमेंट घ्यायच्या आधी डॉक्टरांची परवानगी घ्या.
- स्पा ट्रीटमेंट घ्यायला जाताना पायाला सोयीस्कर आणि आरामदायी अशा चपलेची निवड करा. ज्यामुळे कुठलंही फंगस इन्फेक्शन होणार नाही.
- तनामनाला ताजंतवानं करण्यासाठी स्पा ट्रीटमेंट केली जाते. त्यामुळे ती करण्यासाठी जाताना सगळे मानसिक ताण-तणाव विसरून जा.
- स्पा करताना मोबाइलवर फेसबुक चेक करणं, फोटो काढत बसणं किंवा सेल्फी काढू नका. उगाचच कँडी क्रशसारखे खेळही खेळत बसू नका. यामुळे तुमचं लक्ष उगाचच दुसरीकडे जातं. शक्यतो फोन सायलेंटवर करून ठेवा किंवा चक्क लॉकरमध्ये ठेवा. स्पा थेरपी एंजॉय करा.

# नवरात्रोत्सवासाठी ३ सुंदर साड्यांचा पर्याय

## वजनाने हलक्या अन् स्टाइलमध्येही जबरदस्त

**परंपरागत पद्धतीने पूजा-अर्चना करून नवरात्रोत्सवास प्रारंभ केला जातो. उत्सवांदरम्यान महिलांना नटण्या-सजण्याची हौस पूर्ण करण्यासाठी आयती संधीच मिळते. पण यंदा हा उत्सव साजरा करताना भरजरी, वजनदार साड्यांऐवजी हलक्या आणि स्टायलिश साड्या नेसून स्वतःला आकर्षक लुक द्या.**

- ऑर्गेन्झा सिल्क : सध्या महिलावर्गामध्ये प्युअर सिल्कसह ऑर्गेन्झा सिल्कचीही क्रेझ पाहायला मिळत आहे. बॉलिवूडमधील बहुतांश अभिनेत्री या ऑर्गेन्झा सिल्कच्या साड्यांपासून सूट ते लेहंग्यापर्यंत असे विविध प्रकारचे पोषाख परिधान करताना दिसतात. वजनाने हलके असण्यासोबतच हे फॅब्रिक मऊ आणि चमकदार देखील असते. या पॅटर्नची साडी नेसून तुम्ही सहजरित्या कॅरी करू शकता.
- शिफॉनची साडी : चमकदार रंगाच्या शिफॉन साडीमुळे मोहक लुक मिळतोच, तसंच ही साडी नेसल्यानंतर कॅरी करणं देखील अतिशय सोयीस्कर ठरते. वजनदार एम्ब्रॉयडरीऐवजी बॉर्डर किंवा सीक्वंस वर्क असणाऱ्या शिफॉनच्या साडीची तुम्ही निवड करू शकता. हटके लुक हवा असल्यास त्यावर स्टायलिश ब्लाउज मॅच करू पाहा.
- कॉटन साडी : बहुतांश महिलांना कॉटन पॅटर्नची साडी नेसणं प्रचंड आवडते. अतिशय हलकी साडी नेसायची असल्यास कॉटन पॅटर्न परफेक्ट निवड ठरू शकते. स्टायलिश लुकसाठी तुम्ही बोट नेकलाइन किंवा स्लीव्हलेस ब्लाउज शिवून घेऊ शकता. अशा पद्धतीने तुम्हाला हटके आणि आकर्षक लुक मिळेल. या पॅटर्नमध्ये फिकट रंगाची साडी नेसल्यासही तुम्हाला मोहक लुक मिळेल, यात काही शंका नाही.

# दुर्गापूजाला मिळवा तुकतुकीत त्वचा

**नवरात्री आणि दुर्गापूजेचे उत्साही दिवस जसजसे जवळ येतात, तसतसा वातावरणातही एक उत्साह, आनंद आणि एकजुटीची भावना जाणवू लागते. हे आनंदाचे प्रसंग त्यांच्यासोबत दिव्यांच्या झगमगाटात रात्री उशिरापर्यंत खेळले जाणारे नृत्य आणि भव्य मेजवानीही घेऊन येतात. या सणांसाठी सुंदर दिसण्यावर बायकांचा सर्वाधिक भर असतो. मात्र, या सणांच्या काळातच त्वचेला अनेकदा वातावरणातील बदल, भरपूर मेकअप आणि बदलत्या हवामानाचा सामना करावा लागतो. या सणासुदीच्या दिवसांमध्ये तुमची त्वचा निरोगी ठेवण्यासाठी त्वचेची नियमित काळजी घेणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तुमच्या त्वचेचे योग्य संरक्षण आणि पोषण केल्याने तुमच्या चेहऱ्यावरील ग्लो हा कृत्रिम नाही, तर नैसर्गिक असतो. मग हा उत्सव कितीही काळ सुरू राहिला, तरीही तुम्ही ताजेतवाने दिसता. काही प्रभावी स्किनकेअर टिप्स तुम्हाला सणासुदीच्या दिवसांत निश्चितच उपयोगाच्या ठरू शकतील...**





- क्लिंझिंगची कमाल : सणासुदीच्या दिवसांत अनेकदा त्वचेला धूळ, घाम आणि मेकअपचा सातत्याने सामना करावा लागतो. यामुळे त्वचेची छिद्र बंद होतात. हे टाळण्यासाठी आणि त्वचा स्वच्छ करून ताजीतवानी ठेवण्यासाठी ती कोरडी पडणार नाही, अशा क्लिन्सरने हळूवार तुमचा चेहरा दिवसातून दोनदा स्वच्छ करा.
- हायड्रेशनला प्राधान्य : त्वचा निरोगी राखण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्वचेतील, शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून त्वचा ओलसर ठेवण्यासाठी दिवसातून कमीतकमी ८ ग्लास पाणी पिण्याचे उद्दिष्ट ठेवा. योग्य हायड्रेशनमुळे तुमच्या त्वचेची लवचिकता आणि तुकतुकीतपणा अधिक सुधारू शकतो. शारीरात जास्ती जास्त पाणी पिण्याचा प्रयत्न करा.
- सनस्क्रीन क्रीमचा वापर : सणांदरम्यान होणाऱ्या दिव्यांच्या झगमगाटामुळे अतिनील किरणे त्वचेला हानी पोहोचवू शकतात. तुमच्या त्वचेचे संरक्षण करण्यासाठी, दररोज SPF 30 किंवा त्याहून अधिक वरच्या दर्जाचे ब्रॉड-स्पेक्ट्रम सनस्क्रीन लावा, मग ऋतू कोणताही असो. हानिकारक अतिनील किरणांपासून त्वचेचे संरक्षण करण्यासाठी घराबाहेर असल्यास दर दोन तासांनी पुन्हा क्रीम लावा.
- मॉइश्चरायझरचा वापर : सणासुदीत तुमची त्वचा तेलकट किंवा कोरडी वाटत असली, तरी ती ओलसर ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे याचा विचार करून मॉइश्चरायझरचा वापर करा. त्वचेला आवश्यक हायड्रेशन देताना, त्वचेची छिद्रे बंद होणार नाहीत, असा हलका मॉइश्चरायझर निवडा. हायलुरोनिक ॲसिड आणि ग्लिसरीन यांसारखे घटक पहा, जे त्वचेवर कोणतेही दुसरे परिणाम होऊ न देता, त्वचा ओलसर ठेवण्यास मदत करतील.
- चांगल्या त्वचेसाठी योग्य बॉडी लोशन : चेहऱ्यासोबतच तुमच्या शरीराला विसरू नका. जर तुम्ही नाचत असाल आणि घाम येत असेल, तर तुमची त्वचा मऊ आणि हायड्रेटेड ठेवण्यासाठी आंघोळीनंतर तुम्हाला सूट होणारे बॉडी लोशन आवर्जून लावा. अतिरिक्त हायड्रेशनसाठी तुम्ही शिया बटर किंवा खोबरेल तेल याचा निश्चितच विचार करू शकता. यामुळे त्वचेचा पोत सुधारण्यास मदत होते.
- वॉटरप्रूफ मेकअप : सणासुदीच्या धामधुमीत नेहमीच वॉटरप्रूफ मेकअप निवडा. वॉटरप्रूफ प्राइमर, फाउंडेशन आणि कन्सीलरसह सुरुवात करा. त्यानंतर, स्मज-प्रूफ आयलाइनर आणि मस्करा. मग दिवसभर तुमचा लूक असाच अप टू डेट ठेवण्यासाठी सर्वात शेवटी सेटिंग स्प्रेचा वापर करा.

## शॉर्ट न्यूज

### शेतकऱ्यांसाठी समुपदेशन

**जालना :** दुष्काळाच्या संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्यासाठी समुपदेशन उपक्रम राबविण्यात येत आहे. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि कर्जफेडीचा वाढता ताण यामुळे शेतकरी अडचणीत आहेत. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना मानसिक आधार मिळावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

### पाणीकपातीचे संकट गडद

**नाशिक :** अपुऱ्या पावसामुळे राज्यातील संभाव्य पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनला आहे. उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्यासाठी पाणीकपातीचा पर्याय विचाराधीन असल्याचे वृत्त आहे. नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि पाण्याची नासाडी टाळावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

### राजकीय घडामोडींना वेग

**नागपूर :** राज्यातील विविध राजकीय मुद्द्यांवरून राजकीय पक्षांमध्ये चर्चा आणि आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षांकडून संघटनात्मक तयारीवर भर दिला जात आहे. स्थानिक प्रश्न, मतदार यादी आणि जनतेच्या अपेक्षा यांवर राजकीय नेत्यांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

### एमपीएससीचे आंदोलन मागे ?

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेले उमेदवारांचे आंदोलन मागे घेण्यात आल्याचे वृत्त आहे. अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या भूमिकेबाबत आणि उमेदवारांच्या मागण्यांबाबत चर्चा सुरू आहे. आंदोलनातील मागण्यांवर सरकारकडून सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा उमेदवारांनी व्यक्त केली आहे.

### मतदार यादीसाठी मुदत

**मुंबई :** महाराष्ट्रातील प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या नागरिकांना नाव समाविष्ट करण्यासाठी किंवा दुरुस्तीसाठी दावे व हरकती दाखल करण्याची संधी देण्यात आली आहे. मतदार यादीच्या पुनरीक्षण प्रक्रियेत पात्र मतदारांची नावे समाविष्ट करण्यावर भर दिला जात आहे. नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# काँग्रेसची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचविणार!

**सरचिटणीसपदी निवड झाल्यानंतर प्रवीणशेठ ओस्तवाल यांचा निर्धार**
**जिल्ह्यात पक्ष संघटन मजबूत करण्यावर भर**

**शिरूर : प्रतिनिधी**

**राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाची ध्येयधोरणे, विचारधारा आणि भूमिका तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविणे, हे आपले प्रमुख उद्दिष्ट राहणार असून पक्षाने दाखविलेला विश्वास ही आनंदाची बाब असली, तरी त्यासोबत मोठी जबाबदारीही आली आहे. त्यामुळे पदाचा उपयोग संघटनवाढीसाठी आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यावर आपला भर राहील, असे उत्तर पुणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे नवनिर्वाचित सरचिटणीस प्रवीणशेठ ओस्तवाल यांनी सांगितले.**

शिरूर तालुक्यातील कारेगाव येथील काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते प्रवीणशेठ ओस्तवाल यांची नुकतीच उत्तर पुणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे कारेगावसह शिरूर तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. पक्षाने सोपविलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडत काँग्रेसचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा निर्धार ओस्तवाल यांनी व्यक्त केला आहे.

ग्रामीण भागात काँग्रेसचे संघटन मजबूत करण्यासाठी गावागावांतील कार्यकर्त्यांना एकत्र आणणे, जुन्या कार्यकर्त्यांना पुन्हा सक्रिय करणे आणि नव्या पिढीला पक्षाच्या विचारांशी जोडणे आवश्यक आहे. केवळ निवडणुकीपुरते मर्यादित न राहता वर्षभर जनतेच्या संपर्कात राहणारे संघटन उभे करण्याची गरज आहे. यासाठी कार्यकर्त्यांशी संवाद, गावपातळीवरील बैठका, जनसंपर्क अभियान आणि स्थानिक प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करण्याचे नियोजन असल्याचे ओस्तवाल यांनी सांगितले.



राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष संविधान, लोकशाही, सामाजिक न्याय, समानता आणि सर्वसामान्यांच्या हक्कांविषयी भूमिका मांडत आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन पुढे जाणे आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देणे, ही पक्षाची विचारधारा जनतेपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. पक्षाची भूमिका केवळ भाषणांपुरती मर्यादित न राहता ती प्रत्यक्ष जनतेच्या प्रश्नांशी जोडली गेली पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

ग्रामीण भागातील शेतकरी, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची भूमिका त्यांनी मांडली. शेतमालाला योग्य भाव, पाणी, वीज, रोजगार, शिक्षण आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचे प्रश्न आजही महत्त्वाचे आहेत. या प्रश्नांचा अभ्यास करून संबंधित प्रशासन आणि शासनाकडे पाठपुरावा करणे, तसेच जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

युवकांना राजकारणात आणि संघटनात्मक कामात अधिक संधी मिळाली पाहिजे, असेही ओस्तवाल यांनी सांगितले. बेरोजगारी, शिक्षण आणि व्यवसायाच्या संधी यांसारख्या प्रश्नांवर युवकांशी संवाद साधून त्यांना पक्षाच्या कामात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न राहणार आहे. युवकांची ऊर्जा, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा अनुभव आणि संघटनेतील समन्वय यांच्या माध्यमातून पक्षाला नवी दिशा देता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिरूर तालुक्यासह काँग्रेसचा जनाधार वाढविण्यासाठी जिल्ह्यात विविध गावांमध्ये पक्षाच्या विचारांशी सहमत असलेल्या नागरिकांना संघटनेशी जोडण्यावर भर देण्यात येणार आहे. स्थानिक प्रश्नांवर जनतेच्या सोबत उभे राहणे, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे आणि पक्षाच्या कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे, या माध्यमातून संघटन अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# नाना रंगी, नाना पैलू असलेले नाना पाटेकर

चार-पाच दिवसांपूर्वी नाना पाटेकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगितले जाणारे निधन ही सर्वांसाठीच धक्कादायक घटना होती. मराठी आणि हिंदी अशा दोन्ही चित्रपटसृष्टीत आपल्या अनेक अजरामर भूमिकांमुळे आगळावेगळा ठसा उमटविणारे प्रसिद्ध अभिनेते, सामाजिक भान जपणारे व्यक्तिमत्त्व आणि ‘नाम फाउंडेशन’च्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणारे कार्यकर्ते, असे नानांचे अनेक पैलू होते. त्यांच्या जाण्याने केवळ चित्रपटसृष्टीचेच नव्हे, तर समाजाचेही अतोनात नुकसान झाल्याची भावना मनात निर्माण होते. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती प्रदान करो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



१९८९ च्या दरम्यान प्रदर्शित झालेल्या ‘सूर्योदय’ या मराठी चित्रपटाच्या माध्यमातून भटक्या-विमुक्त जमातींची व्यथा मांडण्यात आली होती. या चित्रपटाचे चित्रीकरण पारनेर आणि परिसरात झाले असल्याने नाना पाटेकर यांचे पारनेरच्या मातीशीही एक नाते जुळले होते. मी त्यावेळी जेमतेम पाच वर्षांचा असल्याने या चित्रीकरणाच्या आठवणी मला फारशा आठवत नाहीत. मात्र, आमचे आजोबा आणि घरातील वडीलधारी मंडळी नेहमी सांगायची की, आपल्या गावाशेजारी चित्रीकरण झालेल्या या चित्रपटासाठी महत्त्वाच्या भूमिका साकारणारे निळू फुले, श्रीराम लागू, नाना पाटेकर, मोहन आगाशे यांसारखे दिग्गज मराठी कलाकार पारनेर परिसरात वास्तव्यास होते.

सर्व कलाकारांचे चित्रपट पाहताना त्यांच्याविषयी मनात प्रचंड कुतूहल निर्माण व्हायचे. त्याचबरोबर एक हुरहूरही मनात कायम राहायची. एवढे मोठे कलाकार आपल्या गावाजवळ आले असताना आपल्याला त्यांना प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळायला हवी होती, असे नेहमी वाटायचे. मात्र, लहानपणी आलेली ही संधी हुकली आणि त्या कलाकारांना प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा मनातच राहून गेली.

आज नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर या जुन्या आठवणी पुन्हा एकदा जाग्या झाल्या. ‘सूर्योदय’ चित्रपटाच्या निमित्ताने पारनेरशी जुळलेले त्यांचे नाते आणि या दिग्गज कलाकारांच्या पारनेर परिसरातील वास्तव्याच्या आठवणींना येथील जुन्या जाणत्या लोकांनी उजाळा दिला. ‘पारनेर दर्शन’सारख्या वृत्तपत्रातून नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण करताना ‘सूर्योदय’ चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी पारनेर तालुक्यात आलेले हे दिग्गज कलाकार आणि त्यांचा येथील वावर यावर प्रकाश टाकणारा लेख आवर्जून प्रकाशित केला.

स्वाभाविकच, लहानपणापासून मनात कुतूहल असलेला, मात्र आजवर पाहण्याचा योग न आलेला ‘सूर्योदय’ हा चित्रपट पाहण्याची इच्छा पुन्हा उफाळून आली. त्यामुळे काल मी हा चित्रपट पाहिला. चित्रपट पाहताना नाना पाटेकर यांनी आपल्या भूमिकेत अक्षरशः जीव ओतल्याचे जाणवले. त्यांच्या अभिनयातील ताकद आणि भूमिकेशी एकरूप होण्याची त्यांची शैली पाहून त्यांच्याविषयी मनात असलेला आदर आणखी द्विगुणित झाला.

नाना पाटेकर हे केवळ पडद्यावर विविध भूमिका जिवंत करणारे अभिनेते नव्हते, तर आपल्या अभिनयातून सामाजिक वास्तव मांडणारे आणि सामाजिक कार्यातून माणुसकीचे भान जपणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या अभिनयाच्या असंख्य आठवणींसोबतच पारनेरच्या मातीशी जुळलेले त्यांचे नातेही कायम स्मरणात राहील. आदरणीय नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**डॉ.बाबासाहेब फंड**
**सारोळा अडवाई,ता. पारनेर**

(पान १ वरून)

### पशुधनाच्या चारा नियोजनाला वेग

निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत जनावरांना पुरेसा चारा मिळावा, उपलब्ध चाऱ्याचा योग्य वापर व्हावा आणि संभाव्य टंचाईवर वेळेत उपाययोजना करता याव्यात, यासाठी पालकमंत्री विखे पाटील यांनी तालुकानिहाय टंचाई आढावा बैठकांमध्ये पशुधनाच्या चारा नियोजनावर भर दिला. त्यानुसार पशुपालकांचे सर्वेक्षण करून वस्तुस्थिती जाणून घेण्याच्या सूचना पशुसंवर्धन विभागाला देण्यात आल्या.

या मोहिमेंतर्गत पशुवैद्यकीय अधिकारी आणि त्यांचे सहाय्यक प्रत्यक्ष पशुपालकांच्या घरी जाऊन माहिती संकलित करीत आहेत. पशुपालकांकडे असलेल्या जनावरांची संख्या, जनावरांची वर्गवारी, उपलब्ध हिरवा व कोरडा चारा, मुरघासाचा साठा आणि पशुखाद्याची उपलब्धता यांची नोंद घेतली जात आहे. ज्या पशुपालकांकडे सिंचनाची सुविधा आहे, त्यांच्याकडे रब्बी हंगामात चारा पिकांची लागवड करण्यासाठी किती क्षेत्र उपलब्ध होऊ शकते, याचीही माहिती गोळा केली जात आहे.

संकलित माहितीच्या आधारे जिल्ह्यातील चाऱ्याची सद्यस्थिती स्पष्ट होण्यास मदत होणार आहे. उपलब्ध चारा आणि पशुधनाची संख्या यांची सांगड घालून भविष्यात किती चाऱ्याची आवश्यकता भासू शकते, याचा अंदाज घेता येणार आहे. त्यानुसार रब्बी हंगामातील चारा उत्पादनाला प्रोत्साहन देणे, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणे आणि टंचाईग्रस्त भागांसाठी आवश्यक उपाययोजना आखणे शक्य होणार आहे.

सर्वेक्षणादरम्यान पशुधनाच्या नोंदींचीही पडताळणी केली जात आहे. जनावरांच्या कानातील बिल्ला क्रमांकांची भारत पशुधन प्रणाली अर्थात एन.डी.एल.एम.वरील नोंदींशी जुळवणी करण्यात येत आहे. यामुळे पशुधनाची माहिती अद्ययावत होण्याबरोबरच जनावरांच्या नोंदींमधील त्रुटी शोधण्यास मदत होणार आहे. चारा नियोजनासोबतच पशुधनाच्या नोंदींच्या दृष्टीनेही हे सर्वेक्षण महत्त्वाचे ठरणार आहे.

सर्वेक्षणाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण व्हावे आणि संकलित माहिती अचूक असावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने संनियंत्रणावर भर दिला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत कृत्रिम रेतन सेवादात्यांचीही विनामानधन तत्त्वावर मदत घेण्याचे आदेश दिले आहेत. जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दर आठवड्याला सर्वेक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेत आहेत. जिल्हास्तरावर पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. दिघे, डॉ. राजळे, डॉ. हरीश चंद्रे, डॉ. गडाख आणि डॉ. पालवे हे सर्वेक्षणाच्या संनियंत्रणाचे काम पाहत आहेत. तालुकास्तरावरही सर्वेक्षणाला गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये पूर्ण झालेल्या सर्वेक्षणानुसार सर्वाधिक ८ हजार ८६५ पशुपालकांची नोंद शेवगाव तालुक्यात झाली आहे. त्याखालोखाल पाथर्डी तालुक्यात ६ हजार १८८, नगर तालुक्यात ६ हजार २६२, संगमनेरमध्ये ५ हजार ८६२, कोपरगावमध्ये ५ हजार ६१० आणि कर्जत तालुक्यात ४ हजार ८७५ पशुपालकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

इतर तालुक्यांमध्ये अकोले येथे ४ हजार ७०१, जामखेड येथे १ हजार ८९४, नेवासा येथे ३ हजार ६६, पारनेर येथे २ हजार ३१९, राहाता येथे ३ हजार ९२२, राहुरी येथे २ हजार ९९३, श्रीगोंदा येथे ४ हजार १६० आणि श्रीरामपूर येथे ३ हजार ६५४ पशुपालकांची माहिती संकलित करण्यात आली आहे. अशा प्रकारे जिल्ह्यातील एकूण ६४ हजार ३७१ पशुपालकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

दरम्यान, सर्वेक्षणासाठी येणाऱ्या पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना पशुपालकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे. जनावरांची संख्या, उपलब्ध हिरवा व कोरडा चारा, मुरघासाचा साठा, पशुखाद्याची उपलब्धता तसेच सिंचन सुविधेसह चारा उत्पादनासाठी उपलब्ध असलेल्या क्षेत्राची अचूक आणि वस्तुनिष्ठ माहिती द्यावी, असे विभागाने स्पष्ट केले आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीत पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही पशुपालकांसाठी महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे सध्याची उपलब्धता आणि भविष्यातील गरज यांची माहिती वेळेत संकलित करून त्यानुसार उपाययोजना करणे आवश्यक आहे. सुरू असलेल्या सर्वेक्षणातून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे चारा टंचाईचे संभाव्य संकट ओळखून नियोजन करण्याची संधी जिल्हा प्रशासनाला मिळणार आहे. आता या सर्वेक्षणातून समोर येणाऱ्या स्थितीनुसार प्रत्यक्ष चारा उपलब्धतेसाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात, याकडे पशुपालकांचे लक्ष लागले आहे.

### रस्त्याच्या कामात पारनेरच्या पाणीपुरवठा यंत्रणेचे नुकसान!

यांनी केली आहे.

यासंदर्भात नगराध्यक्ष डॉ. कावरे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना लेखी निवेदन दिले आहे. तसेच पारनेर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, संबंधित कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांनाही निवेदनाच्या माध्यमातून या प्रकरणाकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

सुपा एमआयडीसी ते हंगा तलाव यांना जोडणारी पाइपलाइन आणि पंपिंग स्टेशन हे पारनेर नगरपंचायतीच्या मालकीचे असून, शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने त्यांना विशेष महत्त्व आहे. रस्त्याच्या कामादरम्यान या यंत्रणेचे नुकसान झाल्याने भविष्यात पाणीपुरवठ्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असल्याचे नगराध्यक्षांनी निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेचे नुकसान नेमके किती झाले आहे, याची तांत्रिक तपासणी करून दुरुस्तीची कार्यवाही तातडीने करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. रस्त्याच्या कामादरम्यान नगरपंचायतीच्या सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले असल्यास संबंधित ठेकेदाराकडूनच त्याची भरपाई करून घेण्यात यावी, अशी मागणी डॉ. कावरे यांनी केली आहे. नुकसानग्रस्त पाइपलाइन आणि पंपिंग स्टेशन पूर्ववत करण्याचे आदेश ठेकेदाराला द्यावेत, अशी भूमिका त्यांनी निवेदनातून मांडली आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची तातडीने पाहणी करावी, झालेल्या नुकसानीचा पंचनामा करावा आणि दुरुस्तीसाठी आवश्यक तांत्रिक अंदाजपत्रक तयार करावे. त्यानंतर दुरुस्तीचे काम विनाविलंब पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणेला निर्देश द्यावेत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. दरम्यान, रस्त्यांची कामे करताना पाणीपुरवठा पाइपलाइनसह अन्य सार्वजनिक सुविधांची काळजी घेणे आवश्यक असते. मात्र, या प्रकरणात नगरपंचायतीच्या मालकीच्या यंत्रणेचे नुकसान झाल्याचा आरोप पुढे आल्याने संबंधित विभागाच्या कामकाजावर आणि देखरेखीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

आता या प्रकरणात प्रशासनाकडून घटनास्थळाची पाहणी कधी केली जाते, नुकसानीचा पंचनामा करून दुरुस्तीचे काम किती लवकर पूर्ण केले जाते आणि संबंधित ठेकेदाराची जबाबदारी निश्चित करून काय कारवाई केली जाते, याकडे पारनेरकरांचे लक्ष लागले आहे. शहराच्या पाणीपुरवठ्याला बाधा पोहोचू नये, यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश !

आणि रोहित पवार यांनी आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्यांबाबत सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती देण्यात आल्यानंतर आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

चौकशी समितीच्या रचनेबाबत माहिती देताना शिवेंद्रराजे भोसले म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार कायद्याच्या चौकटीत चौकशी समिती स्थापन करण्यात येणार आहे. निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार असून, आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे समितीच्या सचिवपदाची जबाबदारी असेल. मुख्य सचिवांच्या स्वाक्षरीनंतर समितीच्या अंतिम मसुद्याची प्रत आंदोलकांना देण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

या चौकशी समितीत प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे, बी. डी. नाईक आणि गणेश पाटील, पोलीस अधिकारी लखमी गौतम तसेच निवृत्त न्यायाधीश दिलीप भोसले यांचा समावेश असल्याचे मसुद्यात नमूद करण्यात आले आहे. समितीला दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. एमपीएससीच्या परीक्षांमध्ये पेपरफुटीचे प्रकार घडल्याच्या तक्रारींची चौकशी करून संबंधित प्रकरणांबाबत वस्तुस्थिती समोर आणणे, हा या प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग असेल.

दरम्यान, एमपीएससीच्या कामकाजात आणि भरती प्रक्रियेत व्यापक सुधारणा करण्यासाठीही सरकारने पावले उचलल्याचे मंत्र्यांनी सांगितले. प्रशासनातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेली स्वतंत्र समिती तयार करण्यात आली असून, आयोगाच्या कार्यपद्धतीत आवश्यक बदल करण्याबाबत विचार केला जाणार आहे. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या इतर मागण्यांबाबत सरकारची भूमिका मसुद्यात स्पष्ट करण्यात आल्याचेही शिवेंद्रराजे यांनी सांगितले.

आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याचे आश्वासनही सरकारकडून देण्यात आले आहे. त्यामुळे आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी आणि संबंधित प्रशासकीय प्रक्रिया कशा पद्धतीने पूर्ण होते, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष राहणार आहे.

भरती प्रक्रियेच्या दृष्टीने आणखी दोन महत्त्वाचे निर्णय मसुद्यात नमूद करण्यात आले आहेत. सन २०२७ मध्ये होणाऱ्या गट-क परीक्षेतील पदांची संख्या दुप्पट करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच पुढील तीन वर्षांत एकूण ७० हजार पदे भरण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. राज्यातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, प्रत्यक्ष भरतीचे वेळापत्रक, पदनिहाय तपशील आणि अंमलबजावणीची प्रक्रिया याबाबत अधिकृत स्पष्टता येणे अपेक्षित आहे.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे एमपीएससीच्या परीक्षा पद्धतीतील पारदर्शकता, कथित पेपरफुटीच्या प्रकरणांची निष्पक्ष चौकशी आणि सरकारी भरतीतील रिक्त पदांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. सरकारने मागण्यांबाबत मसुदा सादर केल्यानंतर आंदोलन दोन महिन्यांसाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला असला, तरी या कालावधीत आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते का, यावर पुढील भूमिका अवलंबून राहणार आहे.

# संस्कारक्षम पिढी घडविण्याच्या ध्यासाला सन्मानाची मोहोर!

## चंद्रकांतशेठ यांचा उर्मिला कानिटकर यांच्या हस्ते सन्मान | गुणवत्तापूर्ण शिक्षणासह संस्कारक्षम पिढी घडविण्याच्या कार्याची दखल | १०६.४ एफएम अहिल्यानगरतर्फे गौरव

पारनेर : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देतानाच त्यांच्यामध्ये शिस्त, संस्कार, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जाणीव रुजवून त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या शैक्षणिक दृष्टिकोनाचा गौरव करण्यात आला आहे. किसान इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष, उद्योजक तथा पारनेर शहराचे माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांतशेठ चेडे यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सिनेअभिनेत्री उर्मिला कानिटकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. १०६.४ एफएम अहिल्यानगरच्या वतीने आयोजित कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींच्या योगदानाची दखल घेण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा सन्मान महत्त्वपूर्ण ठरला आहे. चेडे यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत त्यांना प्रदान करण्यात आलेल्या या गौरवामुळे किसान इंटरनॅशनल स्कूलच्या शैक्षणिक वाटचालीलाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



### शिक्षण म्हणजे केवळ गुण नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास

आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेत चांगले गुण मिळवून देणे एवढ्यापुरती शिक्षणाची भूमिका मर्यादित राहिलेली नाही. ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता, प्रामाणिकपणा, शिस्त, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे झाले आहे. या मूल्यांची जपणूक झाल्यास विद्यार्थी भविष्यातील आव्हानांना सक्षमपणे सामोरे जाऊ शकतात. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देतानाच त्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणे, विचारांना योग्य दिशा देणे आणि त्यांच्यामध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे, ही शिक्षणसंस्थांची महत्त्वाची जबाबदारी आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संस्कार यांचा समतोल साधण्याच्या विचारातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित होते.

### किसान स्कूलच्या कार्याला नवी प्रेरणा

किसान इंटरनॅशनल स्कूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या व्यापक संकल्पनेला महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रात यश मिळवावे असे नव्हे, तर त्यांनी सुजाण नागरिक म्हणून समाजात आपली जबाबदारी ओळखावी, अशी अपेक्षा शिक्षणव्यवस्थेकडून व्यक्त केली जाते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष क्षमता आणि कौशल्ये दडलेली असतात. त्यांना योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि पोषक शैक्षणिक वातावरण मिळाल्यास या क्षमतांचा विकास होऊ शकतो. शिक्षणातून विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद मिळण्याबरोबरच समाजाप्रती संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर चंद्रकांतशेठ चेडे यांना मिळालेला सन्मान शैक्षणिक क्षेत्रातील मूल्याधिष्ठित कार्याची दखल घेणारा ठरला आहे.

### भविष्यातील कार्यासाठी प्रोत्साहन

कोणत्याही क्षेत्रात सातत्याने कार्य करताना ध्येयाप्रती निष्ठा, दूरदृष्टी आणि समाजाच्या प्रगतीत योगदान देण्याची भावना महत्त्वाची असते. शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाचा गौरव झाल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळते. चंद्रकांतशेठ चेडे यांचा सिनेअभिनेत्री उर्मिला कानिटकर यांच्या हस्ते झालेला सन्मान हा त्यांच्या शैक्षणिक योगदानाची दखल घेणारा महत्त्वपूर्ण क्षण ठरला आहे. या गौरवामुळे किसान इंटरनॅशनल स्कूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत जीवनमूल्यांची शिदोरी देण्याच्या ध्येयाला नवी प्रेरणा मिळाली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कारांची जपणूक आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या त्रिसूत्रीच्या माध्यमातून सक्षम व संवेदनशील पिढी घडविण्याच्या शैक्षणिक दृष्टिकोनाचा या सन्मानाच्या निमित्ताने गौरव झाला आहे.

# पंचनाम्यांच्या विलंबात शेतकरी भरडला; सरसकट कर्जमाफी द्या!

## पाणीटंचाईवर तातडीच्या उपाययोजनांची शंकर नगरेंची मागणी

पारनेर : प्रतिनिधी

तालुक्यात खरीप आणि रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत नुकसानभरपाईसाठी पंचनाम्यांच्या प्रक्रियेत विलंब न करता शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी. तसेच, शरदचंद्र पवार केंद्रीय कृषिमंत्री असताना करण्यात आलेल्या कर्जमाफीच्या धर्तीवर पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंकर नगरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे. पीक नुकसान, कर्जाचा वाढता भार, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि पाणीटंचाई अशा अनेक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने तातडीने दिलासा द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.



### कांदा उत्पादकांसमोर पाण्याचे नवे संकट

पावसाच्या अनिश्चिततेमुळे कांदा उत्पादक शेतकरीही अडचणीत सापडले आहेत. कांदा लागवडीनंतर पुरेसा पाऊस न झाल्याने पिकाला पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना पर्यायी व्यवस्था करावी लागत आहे. मात्र, पाण्याची उपलब्धता कमी राहिल्यास कांद्याची वाढ खुंटण्याची आणि उत्पादन घटण्याची भीती आहे. आधीच खरीप आणि रब्बी हंगामातील नुकसानीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना आता कांदा पिकासाठीही अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. त्यामुळे शेतीतील अनिश्चितता अधिकच वाढली असून, पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नगरे यांनी केली.

### जनावरांच्या चारा-पाण्याचे नियोजन करा

शेतीच्या नुकसानीबरोबरच जनावरांच्या चारा आणि पाण्याचा प्रश्नही गंभीर बनत असल्याचे नगरे यांनी सांगितले. टंचाई आढावा बैठकीत पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून जनावरांच्या संख्येची अचूक आकडेवारी उपलब्ध झाली नसल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. जनावरांची संख्या आणि चाऱ्याची गरज यांचा विचार करून शासनाने नियोजन करणे आवश्यक आहे. त्यासाठी चारा डेपो सुरू करणे, जनावरांना पुरेसे पाणी उपलब्ध करून देणे आणि संभाव्य टंचाईवर मात करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. नागरिकांनाच पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळत नसताना जनावरांची तहान कशी भागवायची, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

### कर्जमाफीची रक्कम थेट खात्यात जमा करा

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केवळ पंचनामे आणि आश्वासनांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष आर्थिक मदत देण्याची गरज असल्याचे नगरे यांनी स्पष्ट केले. शरदचंद्र पवार केंद्रीय कृषिमंत्री असताना करण्यात आलेल्या कर्जमाफीच्या धर्तीवर पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा आणि मदतीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यांत जमा करावी, अशी मागणी त्यांनी केली. पीक नुकसान, कर्जाचा भार, पाणीटंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याची समस्या यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांना आर्थिक मदत, जनावरांसाठी चारा-पाणी आणि नागरिकांसाठी नियमित पाणीपुरवठा या प्रश्नांवर ठोस उपाययोजना करून दिलासा द्यावा, असे आवाहन शंकर नगरे यांनी केले.

### शहरात आठ-आठ दिवस पाणीपुरवठा नाही

पारनेर शहरातील पाणीटंचाईकडे लक्ष वेधताना नगरे यांनी काही भागांत आठ-आठ दिवस पाणी मिळत नसल्याचे सांगितले. शहरासाठी दररोज सुमारे साडेचार लाख लिटर पाण्याची गरज असताना, शासनाकडून टँकरद्वारे सुमारे दोन लाख लिटर पाणीपुरवठा होत असल्याचे त्यांनी नमूद केले.पाण्याची मागणी आणि प्रत्यक्ष पुरवठा यामध्ये मोठी तफावत असल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन सुधारून नागरिकांना नियमित आणि पुरेसे पाणी मिळेल, यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली.

# भक्तिभावाच्या वातावरणात मळगंगा देवीची घटस्थापना

## नवरात्रोत्सवाला उत्साहात प्रारंभ | हजारो समया रात्रंदिवस तेवत ठेवण्याची परंपरा भजन, दांडिया रास, 'खेळ पैठणीचा' आणि रेकॉर्ड डान्स स्पर्धेची पर्वणी

निघोज : प्रतिनिधी

राज्यातील जागृत देवस्थान म्हणून नावलौकिक असलेल्या निघोज येथील श्री मळगंगा देवी मंदिरात रविवारी (ता. ११) सकाळी दहा वाजता शुभमुहूर्तावर घटस्थापना करण्यात आली. धार्मिक विधी, देवीचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणात नवरात्रोत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला. नवरात्रानिमित्त मंदिरात दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांनी गर्दी केली होती. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवात धार्मिक कार्यक्रमांसह विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



### गायखे कुटुंबाकडे पुजारीपदाची परंपरा

मळगंगा देवी मंदिरात अनेक पिढ्यांपासून गायखे कुटुंब देवीचे पुजारी म्हणून सेवा बजावत आहे. घटस्थापनेच्या धार्मिक विधीप्रसंगी पोपट महाराज देशपांडे यांनी पौरोहित्य केले. गायखे कुटुंबातील ग्रामपंचायत सदस्या रुपाली ठकाराम गायखे, मळगंगा बचत गटाच्या अध्यक्षा सविता हरिभाऊ गायखे, सुवर्णा सुनील गायखे आणि संध्या संतोष गायखे यांनी घटस्थापना करून देवीचे दर्शन घेतले. यावेळी राज्यातील दुष्काळाचे सावट दूर होऊन महाराष्ट्र दुष्काळमुक्त व्हावा, तसेच राज्यात सुख, समाधान, शांती आणि समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना देवीच्या चरणी करण्यात आली.

### पहाटेपासून दर्शनासाठी भाविकांची गर्दी

नवरात्रोत्सवाबरोबरच चैत्र महिन्यात भरणाऱ्या यात्रेसाठीही मळगंगा देवीच्या मंदिरात राज्यभरातून भाविक येत असतात. नवसाला पावणारी देवी, अशी मळगंगा मातेची भाविकांमध्ये श्रद्धा आहे. त्यामुळे वर्षभर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची वर्दळ असते. नवरात्रोत्सवाच्या काळात ही गर्दी अधिक वाढते.

### धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त नऊ दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज दुपारी एक ते सायंकाळी पाच या वेळेत भजनांजलीचा कार्यक्रम होणार आहे. तसेच ११ ते १५ तारखेपर्यंत रात्री आठ ते अकरा या वेळेत दांडिया रास रंगणार आहे. या कार्यक्रमात परिसरातील शेकडो महिला आणि युवती सहभागी होत असतात. शुक्रवारी (ता. १६) पियाताई सातपुते प्रस्तुत 'स्वामी मल्हार व भक्तिसंगीत' हा कार्यक्रम होणार आहे. शनिवारी (ता. १७) सचिन कवठेकर यांचा 'खेळ पैठणीचा' हा मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रविवारी (ता. १८) भव्य रेकॉर्ड डान्स स्पर्धा होणार आहे. धार्मिक विधी, देवीचे दर्शन, अखंड तेवणाऱ्या समया आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे निघोज परिसरात नवरात्रोत्सवाचे उत्साही वातावरण निर्माण झाले आहे. या उत्सवाच्या निमित्ताने भाविकांसह महिला, युवती आणि तरुणांना भक्ती व मनोरंजनाची पर्वणी अनुभवता येणार आहे.

# शेतकरीपुत्राच्या संशोधनातून प्रकाशमान तंत्रज्ञानाला नवी दिशा!

## पारनेरच्या डॉ. अनिल ढोले यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी.

पारनेर : प्रतिनिधी

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या बळावर यशाचे शिखर गाठता येते, हे शेवगाव तालुक्यातील बक्तरपूर येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या डॉ. अनिल जालिंदर ढोले यांनी सिद्ध केले आहे. पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स महाविद्यालयात रसायनशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. ढोले यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्राप्त केली आहे. प्रकाशाच्या साहाय्याने विशेष गुणधर्म प्रदर्शित करणाऱ्या रासायनिक पदार्थांवर त्यांनी केलेले संशोधन भविष्यात इलेक्ट्रॉनिक्स, अन्न व पाणी परीक्षण, वैद्यकीय तंत्रज्ञान आणि राष्ट्रीय सुरक्षा यांसारख्या क्षेत्रांसाठी उपयुक्त ठरू शकते.




### प्रकाशमान रासायनिक पदार्थांवर महत्त्वपूर्ण संशोधन

डॉ. अनिल ढोले यांनी डॉ. दिलीप ठुबे यांच्या मार्गदर्शनाखाली 'एक्सायटेड स्टेट इंट्रामॉलिक्युलर प्रोटॉन ट्रान्सफर अँड ॲग्रिगेशन इंड्यूस्ड एमिसिव्ह फ्लोरोफोर्स : सिंथेसिस अँड फोटोफिजिकल प्रॉपर्टीज स्टडी' या विषयावर संशोधन पूर्ण केले आहे. या संशोधनात विशिष्ट रासायनिक पदार्थांची निर्मिती, त्यांचे प्रकाशाशी संबंधित गुणधर्म आणि त्यांच्या रेणूंमध्ये घडणाऱ्या प्रक्रियांचा अभ्यास करण्यात आला. विशिष्ट पदार्थांवर प्रकाश पडल्यावर त्यांच्या रेणूंच्या अंतर्गत रचनेत बदल होतात आणि त्यातून विशिष्ट प्रकारचा प्रकाश उत्सर्जित होतो. अनेक प्रकाशमान पदार्थांची घन अवस्थेतील चमक कमी होण्याची समस्या असते. मात्र, डॉ. ढोले यांच्या संशोधनात घन अवस्थेतही प्रभावी प्रकाश उत्सर्जित करणाऱ्या पदार्थांच्या गुणधर्मांचा अभ्यास करण्यात आला. त्यामुळे प्रकाशमान पदार्थांच्या वापरासाठी नव्या शक्यता निर्माण होऊ शकतात.

### मोबाईल, टीव्हीच्या स्क्रीनवरील रंग अधिक प्रभावी होण्याची शक्यता

या संशोधनाचा उपयोग भविष्यात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात होऊ शकतो. मोबाईल आणि टीव्हीच्या स्क्रीनवरील रंग अधिक उठावदार, स्पष्ट आणि प्रभावी करण्यासाठी विशेष प्रकाश उत्सर्जित करणारे पदार्थ उपयुक्त ठरू शकतात. तसेच विविध उपकरणांमध्ये प्रकाशाशी संबंधित कार्यक्षमता वाढविण्यासाठीही या प्रकारच्या संशोधनाला महत्त्व आहे. अन्न आणि पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठीही या पदार्थांचा उपयोग होण्याची शक्यता आहे. पिण्याच्या पाण्यातील काही हानिकारक घटक, अन्नातील भेसळ तसेच शेतीमालावरील कीटकनाशकांचे अंश शोधण्यासाठी प्रकाशाधारित संवेदन तंत्रज्ञान विकसित करता येऊ शकते.

### बनावट नोटा ओळखण्यापासून वैद्यकीय क्षेत्रापर्यंत उपयोग

विशिष्ट प्रकाशात वेगळ्या पद्धतीने चमकणाऱ्या पदार्थांचा वापर सुरक्षा शाई तयार करण्यासाठी करता येऊ शकतो. त्यामुळे बनावट नोटा, महत्त्वाची शासकीय कागदपत्रे आणि इतर संवेदनशील दस्तऐवजांची ओळख पटविण्यासाठी या संशोधनातून विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाला महत्त्व प्राप्त होऊ शकते. वैद्यकीय क्षेत्रातील बायो-इमेजिंग तंत्रज्ञानासाठीही अशा पदार्थांचा उपयोग होण्याची शक्यता आहे. शरीरातील पेशी आणि जैविक घटक अधिक स्पष्टपणे पाहण्यासाठी प्रकाश उत्सर्जित करणारे विशेष पदार्थ उपयुक्त ठरतात. त्यामुळे भविष्यात निदान आणि जैविक संशोधनासाठीही या क्षेत्रातील प्रगती महत्त्वाची ठरू शकते.

# निघोजमध्ये बैलपोळा मिरवणुकीचा उत्साह

## भंडाऱ्याची उधळण, फटाक्यांची आतषबाजी | मळगंगा देवीच्या जयघोषात अडीच तास मिरवणूक

निघोज : प्रतिनिधी

शेतीशी नाते सांगणारा आणि बळीराजाच्या कष्टकरी सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा बैलपोळा सण निघोज येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मळगंगा देवीच्या बैलपोळ्यानिमित्त काढण्यात आलेल्या पारंपरिक मिरवणुकीत ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील हजारो नागरिक सहभागी झाले होते. मळगंगा देवीचा जयजयकार, भंडाऱ्याची मुक्त उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि टाकळी ढोकेश्वर येथील माईल सिंगर पार्टीच्या बॅन्जो वादनामुळे मिरवणुकीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.



### वेशीपासून मिरवणुकीला प्रारंभ

मळगंगा देवीच्या बैलपोळ्याची मिरवणूक वेशीपासून दुपारी चार वाजता सुरू झाली. मिरवणुकीत देवीच्या बैलाला मानाचे स्थान देण्यात आले. गावातील पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि देवीच्या जयघोषात मिरवणूक मार्गस्थ झाली. मिरवणूक पाहण्यासाठी गावातील तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. ठिकठिकाणी भंडाऱ्याची उधळण आणि फटाक्यांची आतषबाजी करण्यात येत होती. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय आणि उत्साही वातावरणाने भारून गेला होता.

### देवीच्या बैलाचे विधिवत पूजन

वेशीपासून सुरू झालेली मिरवणूक मागील पेठेतून मळगंगा मंदिराजवळ आल्यानंतर बैलपोळ्याचे पुजारी सुनील गायखे आणि महिला भगिनींच्या हस्ते देवीच्या बैलाचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी बैलाला पोळीचा नैवेद्य दाखवून औक्षण करण्यात आले. शेतीच्या कामात बैलांचे असलेले महत्त्व आणि त्यांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या या परंपरेचे ग्रामस्थांनी श्रद्धेने पालन केले.पूजनानंतर मिरवणूक जुनी पेठ, ग्रामपंचायत चौक आणि संदीप पाटील चौक या मार्गाने पुन्हा वेशीपर्यंत आणण्यात आली. जवळपास अडीच तास चाललेल्या या मिरवणुकीची उत्साहात सांगता झाली.

### बदलत्या शेतीपद्धतीतही परंपरा जपण्याचा प्रयत्न

आधुनिक शेतीमध्ये ट्रॅक्टर आणि यांत्रिक साधनांचा वापर वाढल्याने बैलांची संख्या कमी होत आहे. या पार्श्वभूमीवर बैलपोळ्याच्या पारंपरिक धार्मिक प्रथा आणि ग्रामसंस्कृती जतन करण्याच्या उद्देशाने यंदाही मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी मळगंगा देवी यात्रा समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, समितीचे पदाधिकारी, उपसरपंच ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली वरखडे, यात्रा समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ यांची चार दिवसांपूर्वी बैठक झाली होती. गावातील जुन्या धार्मिक रूढी-परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचाव्यात, तसेच सण-उत्सवांमधून गावातील सामाजिक आणि सांस्कृतिक एकोपा टिकून राहावा, या भावनेतून मिरवणुकीचे नियोजन करण्यात आले. ग्रामस्थांनी घेतलेल्या पुढाकारामुळे यंदाचा बैलपोळा सोहळा लक्षवेधी ठरला. देवीच्या बैलाला मान देण्याची परंपरा आणि त्यानिमित्ताने निघणारी मिरवणूक पाहण्यासाठी दरवर्षी पंचक्रोशीतील हजारो नागरिक निघोजमध्ये येतात. यंदाही मोठ्या गर्दीत आणि भक्तिमय वातावरणात हा सोहळा पार पडला.

# देवीभोयऱ्यात अंबिका मातेचा नवरात्रोत्सव भक्तिभावात मंदिरात घटस्थापना

## अखंड तेवणाऱ्या समया, तुळजापूरच्या दिव्यज्योतीचे आगमन | धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

देवीभोयरे : प्रतिनिधी

तालुक्यातील देवीभोयरे येथील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री अंबिका देवी मंदिरात रविवार (ता. ११) सकाळी आठ वाजता विधिवत घटस्थापना करून नवरात्रोत्सवाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. देवीच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध भागांतून भाविक येत असून, मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. तुळजापूर येथून श्री क्षेत्र देवीभोयरे येथे आलेल्या दिव्यज्योतीचे ग्रामस्थांनी उत्साहात स्वागत केले. ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान आयोजित या उत्सवात धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांना अनुभवता येणार आहे.



### अखंड तेवणाऱ्या समयांमधून श्रद्धेचा जागर

अंबिका देवीच्या मंदिरात केदारी कुटुंबीय अनेक वर्षांपासून पुजारी म्हणून सेवा बजावत आहेत. जागृत देवस्थान म्हणून अंबिका देवीची राज्यभर ख्याती असून, नवरात्रोत्सवात दररोज मोठ्या संख्येने भाविक देवीच्या दर्शनासाठी येतात. देवीच्या गाभाऱ्यात ग्रामस्थांकडून समया आणून ठेवल्या जातात. या समया रात्रंदिवस तेवत ठेवल्या जातात. आपल्या कुटुंबातील महिला भगिनी या समयांची अखंड ज्योत तेवत ठेवत भक्तिभावाने देवीची सेवा करतात. या परंपरेतून भाविकांची देवीवरील श्रद्धा, भक्ती आणि कुटुंबाच्या सुखसमृद्धीसाठीची प्रार्थना व्यक्त होते.

### देवीभागवत कथेचे दररोज निरूपण

नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी, रविवार (ता. ११) सकाळी घटस्थापना करण्यात आली. सायंकाळी पाच वाजता देवीभागवत ग्रंथ व कलश मिरवणूक काढण्यात आली, तर रात्री नऊ वाजता विलास अष्टक प्रस्तुत 'आदिशक्तीचा जागर' हा कार्यक्रम झाला.उत्सवकाळात दररोज महाआरती आणि छबिना आयोजित करण्यात येणार आहे. तसेच रात्री साडेआठ ते साडेअकरा या वेळेत वृंदावन धाम येथील देवीभागवतकार सुदाम कृष्ण शास्त्रीजी महाराज यांच्या वाणीतून देवीभागवत कथेचे निरूपण होणार आहे. १२ ते १८ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या कथेत देवीचे महात्म्य, ५२ शक्तिपीठे, आदिशक्ती व पार्वतीचा जन्म, शिवविवाह, महिषासुर वध, गणेश जन्म यांसह विविध पौराणिक कथांचे निरूपण केले जाणार आहे. या माध्यमातून भाविकांना धार्मिक ज्ञानासोबतच आध्यात्मिक चिंतनाची पर्वणी मिळणार आहे.

### मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई

अंबिका देवस्थान ट्रस्ट, नवरात्रोत्सव मंडळ आणि समस्त ग्रामस्थांच्या वतीने भाविकांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. मंदिर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, ग्रामअभियान आणि ग्रामस्वच्छतेच्या माध्यमातून परिसर स्वच्छ करण्यात आला आहे. तुळजापूर येथून आलेल्या दिव्यज्योतीमुळे उत्सवाच्या भक्तिमय वातावरणात आणखी भर पडली आहे. ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेत या ज्योतीचे स्वागत केले.

### रक्तदान शिबिरासह महिलांसाठी 'खेळ पैठणीचा'

सोमवार (ता. १९) रोजी सकाळी होमहवन, त्यानंतर कथा सांगता व काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. दुपारी भाविकांना खिचडी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. याच दिवशी सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेत ओम हॉस्पिटल येथे रक्तदान शिबिर होणार आहे. रात्री नऊ वाजता महिलांसाठी 'होम मिनिस्टर  खेळ पैठणीचा' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मंगळवार (ता. २०) रोजी विजयादशमीच्या निमित्ताने दुपारी पालखी मिरवणूक काढण्यात येणार असून, रात्री 'ही लोककला महाराष्ट्राची' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

# पारनेरच्या विकासासाठी झावरे पाटील मैदानात !

## कामांची प्रत्यक्ष पाहणी | विकास आराखड्याला मंजुरीनंतर निधी खेचून आणला

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विकास आराखड्याला मंजुरी मिळवून घेतल्यानंतर शहरातील विविध विकासकामांसाठी सहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून आणला आहे. केवळ निधी मंजूर करून थांबण्याऐवजी प्रत्यक्ष कामांना सुरुवात करून विकासकामांना गती देण्यावर भर दिला जात आहे.** शहराच्या मूलभूत सुविधांसह धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठीही आगामी काळात भरीव निधी उपलब्ध करून देणार असल्याचा विश्वास सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केला.

पारनेर शहराच्या विकासात महत्त्वपूर्ण भर घालणाऱ्या विविध कामांचा नुकताच शुभारंभ करण्यात आला. या कामांमुळे शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. विकासकामांची प्रत्यक्ष स्थिती जाणून घेण्यासाठी झावरे पाटील यांनी कामांच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. यावेळी कामांचा दर्जा, सुरू असलेली प्रगती आणि कामांची गती यांचा आढावा घेत त्यांनी समाधान व्यक्त केले.



### दशक्रिया विधी परिसराचा विकास

पारनेर शहरातील दशक्रिया विधी परिसराला धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. या परिसरात नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने काँक्रीटीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच दशक्रिया विधीस्थळाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी ५० लाख रुपये आणि वाहनतळाच्या उभारणीसाठी ५० लाख रुपये, अशी एकूण एक कोटी रुपयांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. या सुविधांमुळे धार्मिक विधींसाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय कमी होण्यास मदत होईल. परिसरातील वाहतूक आणि वाहनांच्या पार्किंगचा प्रश्नही काही प्रमाणात सुटण्याची अपेक्षा आहे. शहरात रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश उपलब्ध व्हावा, यासाठी ७५ लाख रुपये खर्चाचे पथदिवे उभारण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे.

### निधीपुरते मर्यादित न राहता कामांना गती

शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून आणल्यानंतर संबंधित कामे प्रत्यक्ष सुरू होणे महत्त्वाचे आहे. याच भूमिकेतून विकासकामांची पाहणी करण्यात येत असल्याचे झावरे पाटील यांनी स्पष्ट केले. पारनेर शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन पायाभूत सुविधा, नागरी सोयी-सुविधा आणि शहराच्या सौंदर्यात वाढ करणाऱ्या कामांना प्राधान्य दिले जाणार आहे. पारनेरच्या विकासासाठी यापुढेही शासनाकडून भरीव निधी आणण्याचा प्रयत्न राहील. शहराचा नियोजनबद्ध विकास करून नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### 'प्रति काशी'ची ओळख जपण्यासाठी चौकांचे सुशोभीकरण

पारनेर शहराला 'प्रति काशी' म्हणून ओळख मिळाली असून, येथील बारा ज्योतिर्लिंगांचे आध्यात्मिक महत्त्व आणि पाराशर ऋषींच्या पवित्र स्मृतींना विशेष स्थान आहे. हा धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करण्याचा संकल्पही झावरे पाटील यांनी व्यक्त केला.पाराशर ऋषींच्या नावाने विशेष चौक विकसित करून त्याचे भव्य सुशोभीकरण करण्यात येणार आहे. यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडण्याबरोबरच पारनेरची धार्मिक आणि ऐतिहासिक ओळख अधिक ठळक होण्यास मदत होईल.

### पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यालाही प्राधान्य

शहरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा असलेला पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न मार्गी लावण्यावरही भर देण्यात येणार आहे. पाणीपुरवठ्याची समस्या सोडविणे, प्रमुख चौकांचा विकास करणे आणि धार्मिक स्थळांशी संबंधित सुविधांमध्ये सुधारणा करणे, अशा विविध बाबी आगामी विकासकामांच्या केंद्रस्थानी असतील. त्यामुळे पारनेर शहराचा सर्वांगीण विकास साधताना नागरी सुविधा आणि सांस्कृतिक वारसा यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com